बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०७ नोव्हेंबर २०२५**

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८८०/२०२५ भा. न्याय संहिता कलम २८१,१२५(अ), मोवाकाक १७७,१८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०६/११/२०२५ रोजी ०२.३० वा चे सुमारास, रसिक हॉटेल जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०६/११/२०२५ रोजी ०८.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नागेशसिंग विजयसिंग चव्हाण, नेम- एमआयडीसी पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात वाहन चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वाहन क्रं. एम एच १३ ई एल १६५८ वरुन सोबत पोकॉ/ १०५९ जाधव असे मिळुन चंदनकाटा रोडने जात असताना नमुद ठिकाणी अज्ञात वाहन चालकाने त्यांचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणाने, बेदरकारपणे चालवून, समोरुन धडक दिल्याने फिर्यादीचे उजव्या पायाचे गडघ्याला मार लागुन जखम होवून रक्त आले व सर्वांगाला मुक्कामार लागुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १६४६ कांबळे |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८७४/२०२५ भा. न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/११/२०२५ रोजी १०.०० वा ते दि. ०४/११/२०२५ रोजी १७.३० वा चे दरम्यान, लष्कर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. ०६/११/२०२५ रोजी १५.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अकिब अकबर कुरेशी, वय- ३२ वर्षे, रा. २०, फक्राद्दीन नगर, लष्कर, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ९०,०००/- रु क्लासीक बुलेट मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच २४ बी डी ७७७७ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५२५ मुलाणी |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५२०/२०२५ भा. न्याय संहिता कलम ९१,९४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०५/११/२०२५ रोजी ०७.०० वा चे सुमारास, राष्ट्रीय महामार्ग क्रं. ५२ वरील हॉटेल वेरणा जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. ०६/११/२०२५ रोजी २१.५१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | पोहेकॉ/ १०४३ गायकवाड, नेम- विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात इसम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील राष्ट्रीय महामार्ग क्रं. ५२ वरील हॉटेल वेरणा जवळील रोडलगत असलेल्या गवतामध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने एका स्त्री जातीचे नवजात अर्भकास जिवंत जन्माला येण्यास प्रतिबंध करुन, त्याच्या मृत्युस कारणीभुत होवून, मृतदेहाची गुप्तपणे विल्हेवाट लावण्यासाठी पिशवीमध्ये ठेवून अपत्य जन्माची लपवणुक केली आहे म्हणून. तपास:- सपोनि- न्यामणे- **९९२३४५५१११** |